1 3 MAR 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून राज्यशास्त्र परिषदेचे अधिवेशन

## 'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाह' यावर विचार मंथन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठराज्यशास्त्र विभाग, नेहरू अभ्यास केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार (दि. १३) मार्चपासून मानव्यशास्त्र सभागृहात राज्यशास्त्र परिषदेचे ३१ वे अधिवेशन व दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

अधिवेशनासाठी 'राज्य शास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व' ही मुख्य संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. अधिवेशनाचे उद्घाटन प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार आहे. सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील असतील. पहिल्या दिवसी बीजभाषण सत्रात प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे बीजभाषण करतील. पहिल्या सत्रात 'भारतीय राजकीय विचारांची सद्यकालीन प्रस्तुतता' या विषयावर प्रा. डॉ. अशोक चौसाळकर मार्गदर्शन करतील. दुसऱ्या सत्रात डॉ. के. के. ऊर्फ काशीनाथ कावळेकर स्मृती व्याख्यानमालेंतर्गत जयदेव डोळे 'सामाजिक चळवळ आणि राजकारण' या विषयावर विचार मांडतील. दुसऱ्या दिवसी चौथ्या सत्रात शोधनिबंध सादरीकरण असेल.

अधिवेशनाचा समारोप राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. अधिवेशनास राज्यशास्त्र संशोधक, अभ्यासक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

13 MAR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशालेचे संचालक डॉ. अजित कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते.

13 MAR 2026 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Shivaji University approves ₹587-crore budget for 2026-27; ₹27cr for research

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The management council of Shivaji University, Kolhapur, has approved an annual budget of Rs587 crore for the 2026-27 academic year during its senate meeting. The budget reflects a deficit of Rs8.91 crore, which the administration said will be covered using the university's internal funds.

The meeting was held at the Rajarshi Shahu Senate Hall under the chairmanship of vice-chancellor Suresh Gosavi. Pro-vice-chancellor Jyoti Jadhav and registrar V.N. Shinde were also in attendance. Senate member Raghunath Dhamakle presented the budget, which places a heavy emphasis on academic excellence, including a dedicated provision of Rs27 crore to promote research.

To bolster the quality of research, the university has allocated Rs2.65 crore for library resources, including books and journals. Additionally, Rs4.14 crore has been set aside for computer system development, while Rs15.73 crore has been earmarked for furniture, electrical infrastructure, and IT hardware.

File photo



The university has allocated Rs2.65 crore for library resources

Student welfare also received significant attention. The budget provides Rs2.5 crore for construction of a new hostel and Rs2.16 crore for repairs of existing hostels and mess facilities. A further Rs12 lakh was allocated specifically for the research scholars' hostel. For sports development, Rs34 lakh has been sanctioned for ground maintenance, Rs30 lakh for equipment, and Rs15 lakh to support athletes participating in international competitions.

A report from the newly established student grievance redressal cell was presented, noting that the concerns of 11 students have been successfully addressed.

The senate witnessed heated exchanges between members and the administration over the university's handling of sewage and effluent treatment plant (ETP) projects. Members expressed frustration when the administration failed to provide satisfactory answers regarding environmental management. Eventually, the administration admitted it had received an official notice from the Maharashtra Pollution Control Board (MPCB).

The Q&A session was particularly tense, with only six questions addressed within the hour. Senate member advocate Abhijit Kapse criticised the administration over the number of vacant seats on the board of studies, calling the situation "unacceptable."

The most serious allegations came from advocate Abhishek Mithari, who raised alarm over disposal of chemical waste and sewage from the administrative buildings, laboratories, and canteens. He pointed out that the ETP system is currently non-operational.

"The university generates 4 lakh litres of sewage daily, which is being discharged into the ground without scientific treatment. In some areas, this waste flows directly into Rajaram Lake," Mithari said.

1 3 MAR 2026

जनप्रवास

# 'ए आय' वर स्वार होणारे टिकतील, विरोध करणारे बाहेर फेकले जातील

## अतुल कहाते: विद्यापीठात मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे उद्घाटन

**जनप्रवास : कोल्हापूर**

नोकऱ्या जाणार याची भीती सोडून 'ए आय' बाबत जागरुकता वाढवून त्याची कौशल्ये प्राप्त केली पाहिजेत, कामाचे सुलभीकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांतिकारक भूमिका बजावेल. 'ए आय' सोबत काम करण्याची सवय करून घेतली पाहिजे. 'ए आय' ची क्रांती त्सुनामीसारखी आली आहे, त्यावर स्वार होणारे टिकून राहतील, विरोध करणारे बाहेर फेकले जातील, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक व माहिती तंत्रज्ञान तज्ञ अतुल कहाते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने आयोजित "बिझनेस ॲप्लिकेशन ऑफ आर्टिफिशियल इंटलीजन्स" यावरील पाच दिवशीय मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते



बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन हे होते. या कोर्सअंतर्गत पुढील पाच दिवसात नामवंत तज्ज्ञांची ३० व्याख्याने होणार आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या ज्ञान आणि कौशल्यासह विद्यार्थी जगातील प्रश्नांना सामोरे जावेत यासाठी या अभ्यासक्रमाचे आयोजन पीएम – उषा (सॉफ्ट कॉम्पोनंट) अंतर्गत केल्याचे प्रा. महाजन यांनी सांगितले. डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

13 MAR 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी झाली.

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण जयंती उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशालेचे संचालक डॉ. अजित कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, डॉ. सुधीर देसाई, डॉ. संतोष सुतार, डॉ. उमेश गडेकर, डॉ. कविता वड्राळे, डॉ. वैशाली भोसले, डॉ. गजानन साळुंखे, चेतन गळगे, एच. ए. तिरमारे, डॉ. वैशाली सावंत, डॉ. परशुराम वडार, डॉ. प्रताप खोत, मृणालिनी जगताप, डॉ. उर्मिला दशवंत, डॉ. विश्वजित पाटील, सारंग कांबळे, वसुंधरा कांबळे, दशरथ एडके होते.

1 3 MAR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात १७ रोजी पद्माराजे स्मृती व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका' या विषयावर मंगळवारी (दि. १७) पद्माराजे स्मृती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत कार्यक्रम होणार असून पद्मश्री राहिबाई पोपरे प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव असतील. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

13 MAR 2026
सकाळ

# यशवंतराव चव्हाण यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. मुख्य प्रशासकीय इमारतीत कार्यक्रम झाला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नितीन माळी, डॉ. अजित कोळेकर, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. भारती पाटील, डॉ. सुधीर देसाई, डॉ. संतोष सुतार, डॉ. उमेश गडेकर, डॉ. कविता वड्राळे, डॉ. वैशाली भोसले, डॉ. गजानन साळुंखे, चेतन गळगे, एच. ए. तिरमारे, डॉ. वैशाली सावंत, डॉ. परशुराम वडार, डॉ. प्रताप खोत उपस्थित होते.